' प्रेस नोट '

दिनांक १२/०८/२०२५

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. यश संतोष सोनुने,वय २३ वर्ष, व्यवसाय— नोकरी पद—डाटा एन्ट्री ऑपरेटर, समाजकल्याण कार्यालय अमरावती, ता.जि.अमरावती, रा. चंदननगर आकोली रोड अमरावती. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २३०००/— रु. |
| तडजोडी अंती स्विकारण्याचे मान्य केलेली लाचेची रक्कम | १८,०००/— रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १८,०००/— रु. |
| घटनास्थळ | न्यु आझाद गणेश मंडळ परिसरासमोर इर्विन दवाखाना जवळ अमरावती. |
| घटना ता. व वेळ | दि. १२/०८/२०२५ चे १६.५७ ते १७:०५ वा. चे सुमारास. |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदार हे शिक्षण घेत असून त्यांचे स्वाधार योजनेचे ४६,५००/— रू. डीडी समाजकल्याण कार्यालय अमरावती येथे आला असल्याबाबत दिनांक ११/०७/२०२५ रोजी यातील इआलोसे यश संतोष सोनुने डाटा एंट्री ऑपरेटर समाजकल्याण कार्यालय अमरावती यांनी तक्रारदार यांना मोबाईल फोन वर सांगितले की, तुमचा स्वाधार योजनेचा डीडी आला आहे. परंतु तुमचे बॅंक अकाउंट डज नॉट एक्झीस्ट असल्याचे दाखवत असुन तुमचा प्रॉब्लेम क्लीअर करून देतो त्यामुळे तुमचे स्वाधार योजनेचे पुर्ण पैसे तुमच्या अकाऊंट ला येवुन जातील परंतु तुमचे अकाऊंटला पैसे आल्यानंतर त्या पैशाची अर्धी रक्कम म्हणजे २३,०००/— रू. तुम्हाला मला दयावी लागेल अशी लाचेची मागणी केली होती.

दिनांक १२.०८.२०२५ रोजी आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान श्री. यश संतोष सोनुने, वय २३ वर्ष, व्यवसाय— नोकरी पद—डाटा एन्ट्री ऑपरेटर, समाजकल्याण कार्यालय अमरावती, ता.जि. अमरावती, रा. चंदननगर आकोली रोड अमरावती. यांनी न्यु आझाद गणेश मंडळ परिसरासमोर इर्विन दवाखाना जवळ अमरावती. येथे तक्रारदार यांचेकडुन तडजोडीअंती पंचासमक्ष १८,०००/—रुपये लाच रक्कम स्विकारली वरुन आलोसे श्री. यश संतोष सोनुने,वय २३ वर्ष, व्यवसाय— नोकरी पद— डाटा एन्ट्री ऑपरेटर, समाजकल्याण कार्यालय अमरावती, ता.जि.अमरावती, रा. चंदननगर आकोली रोड अमरावती. यांना ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीविरुदध पो.स्टे. सिटी कोतवाली येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कार्यवाही ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती, परिक्षेत्र अमरावती चे मा.पोलीस अधीक्षक, श्री. मारुती जगताप, मा.अपर पोलीस अधीक्षक, श्री.सचिन्द्र शिंदे,यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक श्री.मंगेश मोहोड पोलीस कर्मचारी, पोहेकॉ युवराज राठोड, पोहेकॉ विनोद धुळे, पोहेकॉ राजेश मेटकर, पोकॉ वैभव जायले, चालक गोवर्धन नाईक यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क: १)मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र अमरावती, मो.क्र.९८५०४८८७८८

२)श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र मो.क्र.९७६४२१०४८५

३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती मो.क्र.९८२३१११११५५

ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. ललील सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

**टोल फ्री कमांक —** १०६४,०७२१—२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१, ७५१७५७१०६४

(सुनिल किनगे)
पोलीस उपअधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.

Scanned with OKEN Scanner